**श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर जि.सोलापूर**

**<u>पाहिजेत</u>**

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मानधन तत्वावर ''सराफ'' पदाची भरती करावयाची आहे. त्यासाठी पात्र व्यक्तीकडून विहीत नमुन्यात दि.२०/०४/२०१८ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा नमुना व नियुक्तीच्या अटी व शर्ती www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या संकेत स्थळावर व तुकाराम भवन पंढरपूर येथे पाहण्यास उपलब्ध आहेत.

क्र.आस्थापना/का.वि./२६२/२०१८ दि.१०/०४/२०१८

स्वा/-
कार्यकारी अधिकारी
(संपर्क क्र.: ०२१८६-२२४४६६)

**अर्ज** दिनांक /०४/२०१८

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारीसो.

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय :– ''सराफ'' या मानधन तत्वावरील पदाचे नियुक्तीसाठी अर्ज.

संदर्भ :– दि.११/०४/२०१८ रोजीचे दै.संचार, सोलापूर या वर्तमानपत्रातील प्रसिध्द झालेली जाहिरात.

महोदय,

कारणे विनंती अर्ज करतो/करते की, संदर्भात नमुद जाहिरातीला अनुसरून मी **सराफ** या पदासाठी अर्ज करीत आहे. मी श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरात काम करण्यास इच्छूक आहे. सदर कामाचा मला पुरेसा अनुभव आहे. तरी माझ्या अर्जाचा सहानूभूतीपूर्वक विचार करून मला सेवा करण्याची संधी द्यावी ही विनंती. माझी वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे आहे.

१) पुर्ण नाव ————————————————————————————————————————
————————————————————————————————————————

२) पूर्ण पत्ता ————————————————————————————————————————
————————————————————————————————————————

३) मोबाईल क्रमांक ————————————————————————————————————————

४) जन्मतारीख व वय दि. / /१९ (दि.११/०४/१८ रोजी वय : ——/——/——)
(एस.एस.सी. बोर्ड प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत जोडावी.)

५) शैक्षणिक पात्रता ————————————————————————————————————————

६) कामाचा अनुभव ————————————————————————————————————————

७) प्रतिमहा मानधनाची अपेक्षा ————————————————————————————————————————

तरी वरील प्रमाणे माझी सर्व माहिती खरी व बरोबर आहे. सदर नियुक्ती बाबतच्या जाहिरातीतील आणि अर्जासोबतच्या अटी व शर्ती मी वाचलेल्या असून त्या मला मान्य आहेत. तरी माझ्या अर्जाचा सहानभूतीपूर्वक विचार करून सराफ या पदावर काम करण्याची संधी मला द्यावी, हि नम्र विनंती.

आपला विश्वासू,

सोबत खालील कागदपत्राच्या सत्यप्रती जोडल्या आहेत.

१) शैक्षणिक प्रमाणपत्रे.

२) आधारकार्ड.

३) सोने चांदी मुल्याकंन करण्याबाबत अधिकृत सराफ असल्याचे शासकीय प्रमाणपत्र.

४) कोणताही गुन्हा दाखल नसलेबाबत संबंधीत पोलीस स्टेशनचा दाखला.

५) अनुभव प्रमाणपत्रे.

## श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
## भरतीचे अटी व शर्ती (जाहिरात दि.११/०४/२०१८).

१. अर्जदाराचे वय कमाल ५८ वर्षे असावे. जन्मतारखेचा पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
२. कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच तो सोलापूर जिल्हातील रहिवाशी असावा.
३. सोने चांदी मुल्याकंन करण्याबाबत अधिकृत सराफ असल्याचे शासकीय प्रमाणपत्र अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची शैक्षणिक पात्रता दहावी पास असावी. तत्सम कामाचा ५ वर्षाचा अनुभव असावा.
४. सदर पदावरील पात्र उमेदवाराची निवड तंज्ञ अधिकारी व मंदिर समिती पदाधिकारी यांचेकडून मुलाखतीद्वारे करण्यात येईल.
५. सदर भरतीसाठी कोणत्याही प्रकारचे आरक्षण लागू नाही.
६. उमेदवारास मुलाखतीवेळी आवश्यक ती मुळ कागदपत्रे व त्यांच्या सांक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील.
७. अर्जासोबत आपल्या नावे कोणताही गुन्हा दाखल नसलेबाबत संबंधीत पोलीस स्टेशनचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
८. सदरची नियुक्ती ११ महिन्याच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर करण्यात येईल. तसेच दर तीन महिन्यानी कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.
९. ११ महिने पुर्ण झालेनंतर कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून, संबंधितांकडून योग्य अटी व शर्तीचे बंधपत्र घेवून, त्यांची नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.
१०.सदर नियुक्तीव्दारे मंदिर समितीकडे कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा कोणताही अधिकार उमेदवारास राहणार नाही.
११. गुणवत्ता पाहून मानधन देण्यात येईल व नियुक्तीच्या पहिल्या वर्षात मानधनामध्ये वाढ देण्यात येणार नाही. तसेच मानधना व्यतिरिक्त इतर कोणतेही लाभ अथवा भत्ते लागू होणार नाहीत.
१२. कामाची वेळ नेमून दिली जाईल त्या वेळेत काम करावे लागेल. तसेच आवश्यक भासेल तेंव्हा जादा वेळ काम करावे लागेल.
१३. काम मध्येच सोडावयाचे असल्यास तशी एक महिना अगोदर नोटीस देणे आवश्यक राहील. अचानक काम सोडता येणार नाही. अचानक काम सोडणेस एक महिन्याचे मानधन जमा करावे लागेल.
१४. कामाची प्रगती व वर्तन असमाधानकारक असल्यास तात्काळ कामावरुन कमी करण्याचा अधिकार कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना राहील.
१५. श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरात आपल्या कुटुंबातील व्यक्ती कामाला असल्यास अर्ज करता येणार नाही.
१६. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची भरती प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित अथवा रद्द करण्याचा अधिकारी मंदिर समितीने राखून ठेवला आहे.
१७. निवड झाल्यास नेमणुकीच्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत रु.१००/- च्या स्टॅपपेपरवर तहसीलदार यांचे समोर सादर केलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.
१८. कामकाजाचे स्वरूप :- समितीकडे भाविकांकडून प्राप्त झालेले देणगी / भेट स्वरूपातील सोने चांदी दागिन्यांचे / वस्तूंचे मुल्यांकन करणे.

------XXX------